## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

## २०२१ - २२

# निबंध स्पर्धा

“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार”
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

कोल्हापूर

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे**
**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)**
**मराठी विभाग आयोजित**

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा (दि. १ ते १५ जानेवारी, २०२२)

## सूचना

**दि. २७.१२.२०२१**

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त व्याख्यान, भेट व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली नाव नोंदणी प्रा.डॉ.प्रदीप पाटील (संपर्क ९७६३२४३०१७) किंवा प्रा. बी. के. गोसावी (संपर्क ९४२३२७०९४७) यांच्याकडे दि.३१.१२.२०२१, दुपारी १२.३० पर्यंत करावी.

| अ.क्र. | वार, दिनांक | कार्यक्रम तपशील | वक्ते / पाहुणे / आयोजक | स्पर्धेचे ठिकाण व वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | शनिवार दि. १ जानेवारी २०२२ | व्याख्यान- मराठी भाषा : संस्कार,संस्कृती आणि संवर्धन | प्रा.डॉ. महेश गायकवाड | रुम नं. १४ स. १०.०० वा. |
| २ | सोमवार दि. ३ जानेवारी २०२२ | लघुपट - बलुतं (परिसंवाद) | सर्व विद्यार्थी | रुम नं. १९ स. १०.३० वा. |
| ३ | मंगळवार दि.४ जानेवारी २०२२ | शुध्दलेखन स्पर्धा | प्रा.डॉ. प्रदीप पाटील | रुम नं. २१ स. १०.३० वा. |
| ४ | बुधवार दि. ५ जानेवारी २०२२ | शासकीय मुद्रणालय भेट | विद्यार्थी, मराठी विभाग | --- |
| ५ | गुरुवार दि. ६ जानेवारी २०२२ | व्याख्यान - व्यक्तिमत्व विकास | डॉ. स्वप्निल बुचडे | रुम नं. १९ स. १०.०० वा. |
| ६ | शुक्रवार दि. ७ जानेवारी २०२२ | वक्तृत्व स्पर्धा | विद्यार्थी, विद्यार्थिनी | रुम नं. २१ स. १०.३० वा. |
| ७ | शनिवार दि. ८ जानेवारी २०२२ | व्याख्यान -मराठी भाषा व रोजगाराच्या संधी | प्रा.डॉ. प्रदीप पाटील | रुम नं. १४ स. १०.३० वा. |
| ८ | सोमवार दि.१० जानेवारी २०२२ | काव्यवाचन स्पर्धा | प्रा बी. के. गोसावी | रुम नं. २१ स. १०.३० वा. |
| ९ | मंगळवार दि.११ जानेवारी २०२२ | वाचन स्पर्धा | प्रा.डॉ. प्रदीप पाटील | रुम नं. २१ स. १०.३० वा. |
| १० | बुधवार दि. १२ जानेवारी २०२२ | विवेक भित्तीपत्रिका | विद्यार्थी, मराठी विभाग | नोटीस बोर्ड |
| ११ | गुरुवार दि. १३ जानेवारी २०२२ | वादविवाद स्पर्धा | डॉ. स्वप्निल बुचडे | रुम नं. १४ स. १०.०० वा. |
| १२ | शुक्रवार दि. १४ जानेवारी २०२२ | निबंध स्पर्धा | विद्यार्थी, विद्यार्थिनी | रुम नं. २१ स. १०.३० वा. |
| १३ | शनिवार दि. १५ जानेवारी २०२२ | व्याख्यान- वाचन संस्कृती जोपासली पाहिजे | प्रा बी. के. गोसावी | रुम नं. १४ स. १०.०० वा. |

| वक्तृत्व स्पर्धेचे विषय | निबंध स्पर्धेचे विषय | वादविवाद स्पर्धेचा विषय |
|---|---|---|
| १.ज्ञानसूर्य शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे | १.संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे | ऑनलाईन शिक्षण : योग्य की अयोग्य |
| २.स्वामी विवेकानंद : युवकांचे प्रेरणास्थान | २. स्वामी विवेकानंद : युवकांचे प्रेरणास्थान | |
| ३.मराठी भाषेने मला काय दिले? | ३.मराठी भाषेचे भवितव्य | |
| ४.मानवाची कोरोनाशी लढाई | ४.कोरोना काळातील ऑनलाईन शिक्षणपध्दती | |

टीप :
१) शुध्दलेखन स्पर्धेसाठी कागद पुरविले जातील.
२) वक्तृत्व स्पर्धेसाठी ५ + २ मिनिटे इतका वेळ असेल.
३) काव्यवाचन स्पर्धेसाठी एकच स्वरचित कविता सादर करता येईल.
४) वाचन स्पर्धेसाठी कविता सोडून कोणत्याही गद्याचे वाचन करता येईल.
५) वादविवाद स्पर्धेसाठी दोन विद्यार्थ्यांचा गट असावा प्रत्येक गटास ५+५ मिनिटांचा वेळ राहील.
६) निबंध लेखन स्पर्धेसाठी पानाच्या एकाच बाजूस सुवाच्य हस्ताक्षरात लिहावे.

**प्रा. बी. के. गोसावी**
मराठी विभागप्रमुख

**डॉ. आर. आर. कुंभार**
**प्राचार्य**
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

E:\Marathi Dept\Marathi Bhasha Samvardhan Pandharwada 21.docx

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर, संचालित

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर(स्वायत्त)

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा – २०२२

## निबंध स्पर्धा

## संकलित निकाल

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | परीक्षक – १ | परीक्षक – २ | परीक्षक – ३ | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | स्वप्नगंधा दिलीप कांबळे | २६ | ३२ | २९ | ८७ |
| २. | प्रतीक्षा मोहन पोवार | ३० | ३६ | ३१ | ९७ |
| ३. | प्रणाली प्रकाश पोवार | ३५ | ४० | ३८ | ११३ |
| ४. | नयन नारायण पाटोळे | २९ | ३४ | ३२ | ९५ |
| ५. | पूनम माणिक घुले | ३० | ३५ | ३३ | ९८ |
| ६. | वैशाली सहदेव पाटील | २७ | ३३ | ३० | ९० |
| ७. | प्रतीक्षा सुर्यकांत सूर्यवंशी | ३२ | ३८ | ३५ | १०५ |

**प्रथम क्रमांक** : प्रणाली प्रकाश पोवार

**द्वितीय क्रमांक** : प्रतीक्षा सुर्यकांत सूर्यवंशी

**तृतीय क्रमांक** : पूनम माणिक घुले

उत्तेजनार्थ – १ : प्रतीक्षा मोहन पोवार

उत्तेजनार्थ – २ : नयन नारायण पाटोळे

परीक्षक – ३
डॉ. स्वप्निल बुचडे

परीक्षक – २
डॉ. प्रदीप पाटील

परीक्षक – १
प्रा. भाऊसाहेब गोसावी

# ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार

## श्री विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

नाव := प्रणाली प्रकाश पोवार

इयत्ता := B.A. – I

दिनांक := 14-01-2022

मराठी विभाग प्रमुख := प्रा. बी. के. गोसावी

## निबंध स्पर्धा

निबंधाचे नाव := मराठी भाषेचे भवितव्य

Sulekha

Page No :
Date :

# मराठी भाषेचे भवितव्य

माझ्या मराठी मातीचा लाव ललाटास टिळा।
हिच्या संगे जागतील द्र्याखोऱ्यातील शिळा॥

कवी कुसुमाग्रजांच्या या काव्यपंक्ती अगदी सहज मराठीचे मोठेपण, दऱ्यामधील शिळांनाही सजीव बनवण्याचे सामर्थ्य सांगून जातात. मराठी मातीची पर्यायाने मराठी भाषेची ताकद वरील चारोळीमधून प्रतीत होताना दिसतात. ज्या संघटित संघाद्वारे लोक एकमेकांशी बोलतात, परस्परांशी बोलू शकतात. भावना विचार यांचे आदान प्रदान करू शकतात त्या संघालाच ढोबळमानाने भाषा म्हटले जाते. सुमारे ७०० वर्षांपूर्वी नामदेवांनी आपल्या अभंगात छप्पन्न भाषांचा केलास गौरव, भवार्णवी नाव उभारली। असे वर्णन केलेले होते. यातील छप्पन्न हा शब्द संख्यावाचक नाही, छप्पन्नी म्हणजे हीन, प्रतिष्ठितांनी न बोलण्याची भाषा. ज्या काळात संस्कृतच्या तुलनेत जिला हीन मानायचे, त्या मराठीला ज्ञानेश्वरांनी अमृताशी पैज लावण्याइतक्या गौरवपूर्ण पदावर नेऊन ठेवली आहे. स्थूलमानाने महाराष्ट्र ही मराठीची जननी मानली जाते. इ.स. ७ वे शतकापासून मराठी बोलभाषा म्हणून प्रचारात आली. सुमारे १३०० वर्षांपूर्वी वैभवशाली परंपरा असणारी मराठी भाषा सर्वाधिक बोलली जाणारी जगातली १५ वी भाषा आहे, तसेच ती भारतातील चौथ्या क्रमांकाची भाषा ठरते. सुमारे ९ कोटी लोक हे मराठी भाषा बोलतात. लिहणे, वाचणे, बोलणे, आकलन करणे या संदर्भात विविध भाषांचा वेग हा वेगवेगळा असतो. एखाद्या भाषेबाबत पूर्ण कळण्याच्या स्थितीमध्ये वेग राखता येईल, अशी भाषा वेगवान ठरते. मराठी ही जगातील पहिल्या ५ वेगवान भाषांपैकी एक भाषा आहे. मात्र तरीही आजच्या काळात मराठी भाषेचे भवितव्य ? हा काळजीच्या सुरात विचारला जाणारा प्रश्न जन्माला आला आहे.

Sulekha